N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): जालना    **P.S.**(ठाणे): गोंदी    **Year** (वर्ष): 2021

   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0123    **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 08/04/2021 16:35 बजे

2. **S.No.** (अ.क्र.) **Acts** (अधिनियम) **Sections** (कलम)

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

   1. **Day**(दिवस): गुरूवार    **Date From** (दिनांक पासून): 11/02/2021
   **Time Period** (कालावधी):    **Date To** ( दिनांक पर्यंत): 11/02/2021
   **Time From** (वेळेपासून): 11:59 बजे
   **Time To** (वेळेपर्यंत): 13:07 बजे

   (b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):
   **Date** (दिनांक ): 08/04/2021    **Time** (वेळ): 16:35 बजे

   (c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ
   **Entry No.** (नोंद क्र.): 014    **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 08/04/2021 16:35 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

   1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 20 किमी
   **Beat No.** (बिट क्र.):

   (b) **Address** (पत्ता): साष्ट पिंपळगाव ,येथे पोलीस चौकी जवळ

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
   **Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):
   **District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

   (a) **Name** (नाव): गणेश अप्पासाहेब कदम

   (b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

   (c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1989    (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

   (e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

   (f) **Passport No.**(पारपत्र क्र.):    **Date of Issue** (दिल्याची तारीख):
   **Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

   (g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
   ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

   (h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | सुरळेगाव, ता गेवराई जि बीड ,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | सुरळेगाव, ता गेवराई जि बीड ,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | भास्कर रामहरी आहेर | | | 1. पोहेकॉ/723 नेमणूक पोलीस स्टेशन , गोंदी जि जालना,गोंदी,जालना,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय रुपये | 15,000/ रुपये लाचेची रक्कम मागणी अ.पा. लागलेली | 15,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 15,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 08/04/2021मो गणेश अप्पासाहेब कदम, वय 32 वर्ष, व्यवसाय शेती व रेती वाहतुक,रा.सुरळेगाव, ता. गेवराई जि.बीड. मोबाईल नंबर 9146407478,समक्ष पोलीस स्टेशन गोंदी जि.जालना येथे हजर राहुन फिर्याद देतो की, मी जालना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक श्री.निकाळजे साहेब यांना माझ्या मोबाईल फोनवरुन संपर्क करुन माझे ट्रॅक्टर गोंदी पोलीसांनी पकडुन पोलीस ठाणे गोंदी येथे गुन्हा दाखल केला व त्यासोबत माझी मोटार सायकल व मोबाईल सुध्दा जमा करुन घेतला आहे. माझी मोटार सायकल व मोबाईल सोडवण्यासाठी गुन्हयाचे तपासी अंमलदार आहेर साहेब हे माझ्याकडे लाच मागत असुन त्यांचे विरुध्द माझी तक्रार असल्याची माहिती दिली होती. त्यावरुन जालना येथिल लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी श्री.निकाळजे साहेब यांनी मला शहागड ते बीड जाणारे हायवे रोडचे बाजुस सुरक्षीत ठिकाणी थांबुन राहण्याचे सांगितले. त्यानंतर श्री.निकाळजे साहेब हे पंच व स्टापसह शहागड येथे मी थांबलेल्या ठिकाणी बीड कडे जाणारे हायवे रोडचे बाजुस सुरक्षित ठिकाणी आले. त्यांचे व दोन पंचा समक्ष हजर येऊन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणी राहणारा असुन शेती, रेती वाहतुक व्यवसाय करतो. दिनांक 28.01.2021 रोजी माझे ट्रक्टर क्र. एम. एच. 20 सी.एच. 9370 मध्ये रेतीची वाहतूक करत असतांना सदरचे ट्रक्टर गोंदी पोलीसांनी पकडले असुन नेथुन मी ट्रक्टर सोडुन निघुन आलो, असल्याचे सांगितले. त्यावरुन मी लगेच त्याठिकाणी माझ्या मोटार सायकलवर आलो तेथील पोलीसांनी माझे नाव गाव विचारुन माझ्यावर गोंदी पोलीस स्टेशन येथे वाळु वाहतुकीचा गुन्हा दाखल केला व ट्रक्टर शहागड पोलीस चौकीमध्ये आणुन उभे केले. तसेच त्यासोबत माझी मोटार सायकल व मोबाईल सुध्दा जमा करुन घेतला होता. त्यानंतर मी दिनाक 07.02.2021 रोजी माझी मोटार सायकल व मोबाईल सोडविण्याकरता शहागड पोलीस चौकीमध्ये जाऊन तपासी अंमलदार आहेर साहेब यांना माझी मोटार सायकल व मोबाईल सोडवण्याची विनंती केली. तेव्हा तपासी अंमलदार श्री.आहेर साहेब यांनी माझेवर पोलीस स्टेशन गोंदी येथे दाखल असलेला गुन्हा रजिस्टर न 32/2021 या गुन्हयात अटक करुन पी. सी.आर न घेण्यासाठी व जामीन करण्यास मदत करण्यासाठी तसेच ट्रक्टर सोडवण्यासाठी कोर्टात से दाखल करण्यासाठी तसेच तुझी मोटार सायकल व मोबाईल सोडवायचे असेल तर मला 15,000/-रुपये दयावे लागेल. नसता तुझी मोटार सायकल व मोबाईल सोडणार नाही व तुझी जामिनही होऊ देणार नाही असे म्हणुन माझ्याकडे लाच मागितली. त्यावेळी मी त्यांना साहेब माझ्या जवळ एवढे पैसे नाहीत, काहीतरी कमी करा असे म्हणालो असता श्री.आहेर साहेब यांनी मला तु बाकी काही सांगु नको, तु पैसे दिले तरच तुझी मोटार सायकल व मोबाईल सोडवून देतो व गुन्हयामध्ये तुला मदत करतो असे म्हणाले,त्यावेळी मी घाबरुन जाऊन त्यांना पैशाची जमवा जमव करुन पैसे आणुन देतो असे म्हणलो होतो. माझी शहागड पोलीस चौकी येथील तपासी अंमलदार श्री. आहेर साहेब यांना लाच दायची इच्छा नाही परंतु त्यांना लाच दिली नाही तर ते माझी मोटार सायकल व माझा

मोबाईल परत देणार नाही. तसेच माझ्यावर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये मला मदत करणार नाहीत व त्रास देतील. तपासी अंमलदार श्री.आहेर साहेब यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. श्री.आहेर साहेब हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. मी आज तपासी अंमलदार यांना माझी मोटार सायकल व मोबाईल सोडविण्या बाबत फोनवर विचारणा केली असता त्यांनी मला आज साष्टपिंपळगाव येथील चौकीमध्ये [redacted] भेटण्याचे फोनवर सांगितले आहे.मी आज दिनाक 11.02.2021 रोजी तपासी अंमलदार श्री. आहेर साहेब, यांना भेटण्यासाठी सा[redacted]पिंपळगाव पोलीस चौकी येथे जाणार असून मी त्यांना माझे विरुध्द पोलीस स्टेशन गंदी येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये जामीन बाबत मदत करण्यासाठी तसेच माझी मोटार सायकल व मोबाईल सांडवून घेण्याविषयी विनंती करणार आहे, त्यावेळी श्री. आहेर साहेब यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वतः किंवा इतरामार्फत स्विकारल्यास त्यांना पकडन कार्यवाही करावी अशी तक्रार दिली होती. त्यावरुन पोलीस उपअधीक्षक श्री.निकाळजे साहेब यांनी तेथील हजर असलेले शासकिय पंचाना माझी तक्रार दाखविली. त्यांनी ती वाचून त्यावर सह्या घेतल्या त्यानंतर मला पंच क्र. श्री.केशव आहेर यांचे सह व्हईस रेकर्डर चालु करुन देवुन माझ्या गळ्यात अडकवून दिले.त्यानंतर मी व पंच क्र.1 श्री. केशव आहेर असे माझ्या कडील मोटार सायकलने साष्ट पिंपळगाव पोलीस चौकी येथे गेलो असता तेथे तपासी अंमलदार श्री.आहेर यांची भेट घेतली तेव्हा तपासी अंमलदार श्री. आहेर यांनी माझे विरुध्द पोलीस स्टेशन गोंदी येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये माझी मोटार सायकल व मोबाईल सोडवुन देण्यासाठी व गुन्हयात मदत करणेसाठी पंच क्र. 1) श्री.केशव आहेर यांचे समक्ष 15,000/-रुपये लाचेची मागणी करुन थोडया वेळाने घेवुन येण्याचे सांगितले असता मी व पंच क्र.1) श्री. केशव आहेर असे तेथून निघुन शासकिय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो.तेव्हा माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद करुन त्यातील संभाषण हे पोलीस उपअधीक्षक श्री.निकाळजे साहेब यांनी ऐकले व त्याबाबतचा सविस्तर लाच मागणी पडताळणी पंचनामा केला. त्यावरुन तपासी अंमलदार श्री. आहेर यांचे विरुध्द सापळा आयोजीत करण्याचे ठरवून मला व पंचाना अन्थ्रासीन पावडरचे प्रात्याक्षिक करुन करून दाखविण्यात आले.मी तपासी अंमलदार श्री.आहेर यांना लाच म्हणून देण्यासाठी आणलेल्या पैशातुन 15,000/-रूपये वेगळे काढुन त्याला अन्थ्रासीन पावडर लावून तपासी अंमलदार श्री. आहेर यांना देण्यासाठी सदरचे पैसे माझ्या पन्टचे उजव्या खिशात ठेवुन,व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझ्याकडे दिला व मला पंचासह तपासी अंमलदार श्री आहेर यांची भेट घेण्यासाठी साष्ट पिंपळगाव पोलीस चौकी येथे पाठविले असता तेथे तपासी अंमलदार श्री. आहेर साहेब यांनी रली बंदोबस्त असल्याने व सदर ठिकाणी इतर पोलीस बंदोबस्त कामी आलेले असल्याने माझ्या कडून पैसे स्विकारले नाही व मला पैसे घेवुन उदया येण्यास सांगितले तसेच उदया येतांना फोन लावुन ये असे सांगितल्याने मी व पंच क्र.1 श्री.केशव आहेर. असे तेथुन निघुन सापळा पथकाजवळ परत आलो.तेव्हा माझ्याकडील व्हाईस रेकर्डर बंद करुन त्यातील संभाषण हे पोलीस उपअधीक्षक श्री.निकाळजे साहेब यांनी ऐकले व त्यांनी त्याचा सविस्तर सापळा स्थगिती पंचनामा केला. त्यानंतर दिनाक 12/02/2021 रोजी पोलीस उपअधीक्षक श्री.निकाळजे साहेब यांचे सुचनेवरुन मी तपासी अंमलदार आहेर यांना फोन केला असता त्यांनी शहागड चौकी येथे येण्याचे सांगितले त्यावरून मला व पंच क्र. 1 श्री.केशव आहेर असे आम्हास पुन्हा तपासी अंमलदार श्री.आहेर यांना 15,000/- रुपये देण्यासाठी सदरचे पैसे माझ्या पन्टचे उजव्या खिशात ठेवून व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझ्याकडे दिला व मला पंचासह तपासी अंमलदार श्री.आहेर यांची भेट घेण्यासाठी शहागड पोलीस चौकी येथे पाठविले तेथे तपासी अंमलदार श्री. आहेर यांनीमला तुमचे साहेबांचे काय आहे ते अगोदर व्यवहार किलेअर करून घ्या व नंतर मला येवुन भेटा असे म्हणुन माझ्या कडुन पैसे स्विकारले नसल्याने मी व पंच क्र.1) श्री.केशव आहेर असे तेथुन निघून सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आलो.तेव्हा माझ्याकडील व्हईस रेकर्डर बंद करुन त्यातील संभाषण हे पोलीस उपअधीक्षक श्री.निकाळजे साहेब यांनी ऐकले व त्यांनी त्याचा सविस्तर सापळा स्थगिती पंचनामा करण्यात आला.त्या दरम्यान मी तपासी अंमलदार श्री.आहेर साहेब यांची वेळोवेळी भेट घेण्याचा प्रयत्न केला असता शहागड पोलीस चौकी येथील तपासी अंमलदार श्री.आहेर हे त्यांच्या मुलीचे लग्नाकरीता पंधरा दिवस सुट्टीवर गेले असल्याचे समजले. तसेच आज दिनांक 08/04/2021 रोजी मी तपासी अंमलदार श्री आहेर साहेब यांना फोन करून गुन्ह्यातील ट्रक्टर सोडणे च्या अनुशंगाने कोर्टात से दाखल करण्यासाठी व जमा करून घेतलेला मोबाईल परत करणे बाबत विचारपूस केली असता तपासी अंमलदार श्री भास्कर आहेर बक्कल नं.723 पोलीस स्टेशन गोंदी यांनी मला तु आता मला फोन करु नको असे म्हणून फोन बंद केला आहे त्यामुळे तपासी अंमलदार श्री.भास्कर आहेर यांनी लाचेची मागणी करून बरेच दिवस झाले असल्याने त्यांना माझेवर संशय आला असावा आता ते माझ्या कडून पैसे स्विकारणार नाही अशी माझी खात्री झाली आहे,म्हणुन दिनांक 11/02/2021 रोजी 11.59 ते 13.07 वाजेच्या दरम्यान साष्टपिंपळगाव येथील पोलीस चौकी जवळ तपासी अंमलदार श्री.भास्कर रामहरी आहेर पोहेका/723 नेमणुक पोलीस स्टेशन गोंदी यांनी माझे विरुध्द पोलीस स्टेशन गोंदी येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये माझे विरुध्द पोलीस स्टेशन गोंदी येथे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये माझी मोटार सायकल व मोबाईल परत देण्यासाठी व गुन्हयात जामीनची मदत करणेसाठी तसेच ट्रक्टर सोडण्यासाठी कोर्टात चांगला से देण्यासाठी पंच क्र. 1) श्री. केशव आहेर यांचे समक्ष 15,000/- रूपये लाचेची मागणी केली आहे म्हणून त्यांचे विरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक कायदयान्वये कायदेशीर कारवाई करावी.

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): RAVINDRA DEVIDAS NIKALJE
**Rank** (पद): I (Inspector)

**No.**(क्र.): PI **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची)

पोलीस ठाणे अंमलदार

पोलीस ठाणे गोंदी

**Name** (नाव): Hanumant Vikaram Ware

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.):